रे.के.नं.२७/२०१६
नि. क्र. ६४ लगत

**<u>अभियोग पक्षातर्फे साक्षीदार क्र.१० यांचा उलटतपास आरोपी तर्फे विधीज्ञ श्री. भोजने यांचे तर्फे व्ही.सी.वर सुरु</u>**

२. हे म्हणणे खरे आहे की, दि.१९.१०.२०१५ रोजीचा नि.५३ घरझडती पंचनामा वगळता गुन्हयाचा पुर्ण तपास मी केला आहे. दि.२२.१०.२०१५ रोजी घटनास्थळ व मोबाईल जप्ती पंचनामा केला. हे म्हणणे खरे आहे की, जप्त केलेला मोबाईल हा टेकनिशीयन भुषण शिंदे यांचेकडे सीडी तयार करण्यासाठी दिला होता. भुषण शिंदे हा टेकनीशीयन आहे किंवा कसे त्यासंदर्भात त्याच्याकडून कागदपत्रे किंवा प्रमाणपत्र घेतली नव्हते. हे म्हणणे खरे आहे की, दि.२६.१०.२०१५ रोजी टेकनीशीयन भुषण शिंदे यांनी मोबाईल कॉम्प्युटरला जोडून सीडी तयार केली असे पंचनाम्यात नमूद आहे.

३. हे म्हणणे खरे नाही की, टेकनीशीयन भुषण शिंदे यांनी जी सीडी तयार केली ती सीडी मी ताब्यात घेताना कोणताही पंचनामा केला नाही. साक्षीदार क्र.१ मनिष पांडूरंग शिंदे मंदार कॉलेज येथे सुरक्षा रक्षकाचे काम करत होते किंवा कसे ते मला आता आठवत नाही. या कामी मंदार कॉलेज येथील हजेरी पट जप्त केला किंवा कसे ते मला आता सांगता येणार नाही. फिर्यादी ज्या महिला वस्तीगृहात राहत होती त्या ठिकाणचा मी पंचनामा केला आहे. मी ज्यावेळी महिला वस्तीगृहाचा पंचनामा केला त्यावेळी माझ्यासोबत महिला पोलीस अधिकारी नेल्या होत्या किंवा कसे ते मला आता आठवत नाही.

४. हे म्हणणे खरे आहे की, दि.२२.१०.२०१५ रोजी जप्त केलेला मोबाईल दि.२६.१०.२०१५ रोजी चार दिवसांनी कॉम्प्युटरला जोडला होता. तो मोबाईल कॉम्प्युटरला जोडल्यानंतर पुन्हा जप्त करताना त्याचा पंचनामा केला किंवा कसे ते मला आता आठवत नाही. मुलींना महिला वस्तीगृहातून बाहेर पडताना सुरक्षा रक्षकाकडे असणा–या रजिस्टरवर सही करून बाहेर पडावे लागते किंवा कसे हे मी सांगु शकत नाही.

या कामी मी महिला वस्तीगृहातील हजेरी पत्रक किंवा वस्तीगृहात दाखल अथवा बाहेर पडताना जे रजिस्टर असते ते जप्त केले किंवा कसे ते मला आता आठवत नाही.

५. वस्तीगृहातून ज्या महिला बाहेर गेल्या किंवा आत आल्या त्याच्याबाबतचे रजिस्टर मी जप्त केले किंवा कसे ते मला आता आठवत नाही. हे म्हणणे खरे आहे की, साक्षीदार क्र.३ भारती भालचंद्र सावरटकर यांचे आधार कार्ड व फोटो मी जप्त केले नाहीत. आता मला साक्षीदार क्र.३ भारती यांच्या सरतपास नि.४२ मधील मजकूर "जुना मोबाईल असेल तर द्या, त्यांनी सांगितले की,............नवा मोबाईल घ्यावा लागेल, त्यांनी सांगितले की, ............तुम्हाला फोन करतो, सात ते आठ महिन्यांनी...........तेव्हा मी त्यांना नाही असे सांगितले'" इ. वाचून दाखवला. हे म्हणणे खरे नाही की, सदर साक्षीदाराच्या कथनाप्रमाणे मी तपास टिपण नोंदविले नाही.

६. आता मला साक्षीदार क्र.४ भुषण रामचंद्र शिंदे याच्या सरतपास नि.४३ मधील मजकूर "ती घाबरल्याने आमच्याकडे आली...............मेन ऑफीसला आणले" इ. वाचून दाखवला. हे म्हणणे खरे नाही की, सदर साक्षीदाराच्या कथनाप्रमाणे मी तपास टिपण नोंदविले नाही. वस्तीगृहातील जे काही कर्मचारी होते त्यांचे हजेरी पत्रक मी जप्त केले किंवा कसे ते मला आता आठवत नाही. तपासादरम्यान आरोपीने त्याचा एक मोबाईल तोडलेल्या सिमकार्डसह नदीच्या कॅनलमध्ये टाकून दिल्याचे निष्पण झाले होते. म्हणून भा.दं.वि.सं.क.२०१ लावण्यात आले. हे म्हणणे खरे आहे की, तो मोबाईल व तोडलेले सिमकार्ड मिळून आले नाही.

७. हे म्हणणे खरे नाही की, मी संपूर्ण सीडीआर रिपोर्ट या कामी प्राप्त करून घेतले नाहीत. पंचनाम्यासाठी पंचांना हजर राहण्याचे लेखी पत्र दिले होते किंवा कसे ते मला आठवत नाही. हे म्हणणे खरे नाही की, तुषार व गच्ची हे पिडीतेचे मित्र आहेत. मी मानसी मनिष शिंदे यांचा जबाब नोंदवला आहे. तो जबाब मी त्यांच्या सांगण्याप्रमाणे तपासला आहे. हे म्हणणे खरे नाही की, मी या कामी खोटा तपास केला. हे म्हणणे खरे नाही की, मला तपासादरम्यान आरोपीविरुध कोणताही ठोस पुराव मिळून आला नाही. हे

म्हणणे खरे नाही की, आरोपीविरुध्द खोटे दोषारोप दाखल केले. हे म्हणणे खरे नाही की, कथीत घटनेशी आरोपीचा कोणताही संबंध नाही. हे म्हणणे खरे नाही की, सरतपासातील मजकूर खोटा आहे. हे म्हणणे खरे नाही की, फिर्यादी व इतर साक्षीदारांच्या मदतीने खोटा तपास केला व खोटी साक्ष देत आहे. हे म्हणणे खरे नाही की, फिर्यादीचा एल.जी. कंपनीचा मोबाईल मी कधीही जप्त केला नाही. हे म्हणणे खरे नाही की, तपासादरम्यान सीडी व डीव्हीडी जप्त केले असे खोटे सांगत आहे. हे म्हणणे खरे नाही की, आरोपीकडून मोबाईल जप्त केला असे देखील खोट सांगत आहे.

श्रवणोत्तर स्विकृती.
सही/–

(वाय.सी. पाटील )
सह दिवाणी न्यायाधीश क.स्तर, व
न्यायादंडाधिकारी वर्ग–१, चिपळूण

दिनांक – १८/११/२०२५
चिपळूण.

## <u>- प्रमाणपत्र -</u>

मी हमी देतो की, सदरच्या पी. डी. एफ. फाईलमधील मजकुर हा मुळ पुराव्यामधील प्रत्येक शब्दानुसार बरोबर आहे.

| | |
|---|---|
| लघुलेखकाचे नाव | एम.इ.आरेकर, लघुलेखक श्रेणी–३ |
| **न्यायालयाचे नाव** | **सह दिवाणी न्यायालय क.स्तर, चिपळूण, ता.चिपळूण जि.रत्नागिरी.** |
| पुरावा टंकलेखीत दिनांक | १८.११.२०२५ |
| न्यायिक अधिकारी यांनी सही केलेले दिनांक | १८.११.२०२५ |
| पुरावा अपलोड केलेले दिनांक | १८.११.२०२५ |